# प्रस्तावना

वित्तीय समावेश हे एक राष्ट्रीय प्राधान्य क्षेत्र आहे कारण की ते समावेशी विकास सुलभ बनविते. बँकिंग सेवा ह्या बँकविरहित व कमी बँकिंग उपलब्ध असलेल्या क्षेत्रात बँकिंग सेवा पुरविणे तसेच अशा लोकांपर्यंत पोहोचविणे की जे आतापर्यंत वंचित राहिले अथवा आपल्या वित्तीय गरजा भागविण्यासाठी त्यांच्यासाठी बँकिंग कठीण होते, अशा लोकांपर्यंत पोहोचणे एक मोठी बाब आहे. वित्तीय समावेशासाठी अत्यावश्यक जोर लावण्यासाठी माननीय पंतप्रधानांनी 15 ऑगस्ट 2014 रोजी स्वतंत्रता दिवसाच्या आपल्या भाषणांत, एक प्रमुख कार्यक्रम, ज्याला ``पंतप्रधान जनधन योजना'' या नावाने ओळखले जाते, घोषणा केली वित्तीय समावेशाचे हे एक राष्ट्रीय मिशन (मोहिम) आहे, ज्या द्वारे देशभरांतील समस्त कुटुंबांना एका समग्र संकल्पने मार्फत व्यापक वित्तीय समावेशनाअंतर्गत आणायचे आहे. या कार्यक्रमाच्या सुरवातीच्या अंमलबजावणीनंतर, PMJDY च्या अंतर्गत मोठ्या प्रमाणार बँक खाती उघडली गेली. ही खाती सक्रिय करून आतापर्यंत अधिकारांपासून दूर राहिलेल्या जनतेला आर्थिक कार्यक्रमांअंतर्गत या खात्यांमार्फत आपले जीवनमान सुधारण्यासाठी सिद्ध करायचे आहे.

या पार्श्वभूमीतून व्यवसायी मदतनीस/ व्यापारी संपर्की (BF/BC) मॉडेलचा आरंभ (प्रयोग) सुरु झाला. तसेच बँक शाखेची एक विस्तारित प्रतिरुप व जनता यांच्यातील सेतूच्या रुपाने व्यापारी संपर्की/ व्यवसायी मदतनीस कार्यरत आहेत. जनतेपुढे बँक शाखेचा एक चेहरा व संपर्कीचे प्रथमसूत्र यांची भूमिका त्याला वठवायची आहे.

वित्तीय समावेशनातर्फे चांगल्या व्यापारी संधी मिळत असल्यामुळे हे मॉडेल यशस्वी बनविणे गरजेचे आहे. देशभरांत बँकिंग सेवा पुरविणारे सुमारे 2.5 लाख BCs आहेत. कायमस्वरुपी आतापर्यंत वंचित जनतेची सेवा करण्यासाठी तसेंच नेटवर्क मध्ये BC एजंटाना टिकवून त्यांची काहीतरी कमीत कमी प्राप्ती/ उत्पन्न असायला हवे. फिल्ड मधील काही अभ्यासावरुन असे लक्षांत येते की जरी BC ना तंत्रज्ञान जसे POS साधने, सूक्ष्म ATMs व बायोमेट्रिक साधने इत्यादीचे चांगले ज्ञान आहे, परंतु मुलभूत बँकिंग उत्पादने व सेवांचे त्यांचे ज्ञान कमी आहे. या संदर्भात भारतीय बँक संघाने



Edited with the demo version of
Infix Pro PDF Editor
To remove this notice, visit:
www.iceni.com/unlock.htm

BCs ना प्रशिक्षण देणे अनिवार्य केले आहे आणि ठराविक दिवसांच्या प्रशिक्षणानंतर BC एजंटांना IIBF तर्फे प्रमाणित केले जाईल.

या विषयी IIBF तर्फे BC एजेंटांच्या प्रशिक्षणार्थ एक तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम तयार केला गेला आहे. IBA ने याला संमत्ती दिली आहे. या पाठ्यक्रमाचे उद्दीष्ट, BC एजंटना उत्पादनांचे ज्ञान, सॉफ्ट कौशल्य व तंत्रज्ञान विषयक माहिती देणे असे आहे की ज्यामुळे ते आपले कर्तव्य प्रभावीपणे पार पाडू शकतील. पाठ्यक्रमांत, ढोबळपणे, PMJDY ठेवी, कर्ज उधार, सूक्ष्म विमा, पेंशन सेवा, स्वावलंबन योजना, धनप्रेषण सेवा, व वसूलीच्या बाबी इत्यादीचा समावेश आहे.

या प्रमाणपत्र परीक्षेसाठी हे पुस्तक पाठ्यसामग्री च्या स्वरुपांत आहे. हे पुस्तक दोन भागांत विभागलेले आहे. भाग 1 मध्ये मुलभूत बँकिंग प्रणालीचा ढांचा व बँक व्यवहारांचे विहंगाव लोकन आहे. ज्यांत वाचकांना विविध ठेवी, कर्जे, विविध बँकिग सेवा व इतर सेवा पुरविण्यासाठी बँकर ग्राहक संबंधीची देखील माहिती दिली गेली आहे. या भागात BC एजंटांच्या जबाबदाऱ्या वभूमिका तसेच वित्तीय सल्ल्याची गरज, रोखता प्रवाह ची मुलतत्वे व कर्जाची रक्कम, वितरण यादी, वसूली यादी ठरविण्यात त्याचे महत्व. इत्यादी देखील सामिल आहे. भाग II मध्ये PMJDY व्यापक स्वरुपात केंद्रीभूत आहे तसेच तिच्या अंमलबजावणीत BC एजंटांची काय भूमिका आहे याची सविस्तर माहिती आहे.

ही पाठ्यसामग्री बँकिंग उद्योगातील दोन विशेषतज्ञांकडून संस्थेने विकसित करून घेतली आहे आणि त्याची पडताळणी संस्थेच्या दोन आंतरिक संकायाकडून केली गेली आहे. संस्था त्यांच्या सेवेचा आदर करते. BC एजंट, या पुस्तकांत दिलेली माहिती परीक्षेसाठी तसेच आपल्या व्यावहारिक बँकर्सना उपयोगी सिध्द होईल. या पुस्तकाच्या सुधारणेसाठी कर्तव्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपयोगांत आणतील. हे पुस्तक अनुदेशक व सामान्यतया आपल्या सूचना सादर आमंत्रित आहेत.

ठिकाण : मुंबई
दिनांक : 20-2-2015

**डॉ. जे. एन. मिश्रा**
**मुख्य कार्यवाहक अधिकारी**

> संस्थेने या आधीच ``BC/BF मार्फत समावेशक विकास'' नावाचे पुस्तक कित्येक भाषांत प्रकाशित केले आहे. या विषयावरील जास्तीच्या माहितीसाठी BC ना प्रोत्साहित केले जात आहे की त्यांनी ते पुस्तक पण वाचावे.

Edited with the demo version of Infix Pro PDF Editor
To remove this notice, visit: www.iceni.com/unlock.htm